# BBC LEARNING ENGLISH

# Listen here!

## Why do penguins waddle?

*This is not a word-for-word transcript*

**Tejali**
Hello!ऐकलंत का? Listen Hereमध्ये तुमचं स्वागत! मी तेजाली...

**Tom**
And hello again everyone, I'm Tom. Good news for animal lovers! Today we are discussing penguins and asking the question 'why do penguins **waddle**?'

**Tejali**
लहान मुलं, बाळं त्यांच्या छोट्या छोट्या पावलांनी थोडं अडखळत चालतात, दुडूदुडू धावतात. अशा प्रकारच्या चालण्याला किंवा धावण्याला **to waddle** असं म्हणतात.

**Tom**
Let's listen to the first part of today's clip from BBC Radio 4's *Today Programme*!

**Tejali**
Good idea! ही प्रेझेंटर लंडनच्या प्राणीसंग्रहालयातून एक माहिती देतीये. तिथे पेंग्विनच्या चालण्याचा अभ्यास चालू आहे. त्यांच्या हालचालींचा अभ्यास नीट करता यावा, यासाठी तिकडे एक High tech ट्रॅक ही बनवण्यात आला आहे.पेंग्विनच्या चालण्याचं वर्णन करण्यासाठी ती कुठले शब्द वापरते? ऐका.

**Presenter**
With its tiny legs and **stiff, upright posture** a penguin has a **waddle** that's more than a little **ungainly**. But by installing a high-tech track in London Zoo, scientists will measure every tiny movement the birds make.

**Tom**
Did you hear that penguin? She mentions **posture**.

**Tejali**
**Posture** म्हणजे शरीराची ठेवण. व्यक्ती उभी असताना किंवा बसलेली असताना तिच्या शरीराची स्थिती कशी असते याचं वर्णन करताना posture हा शब्द वापरतात. तिने पेंग्विनच्या शरीराचं वर्णन करताना '**stiff'**, and '**upright'** असं केलं. **Stiff** म्हणजे ताठ आणि **upright** म्हणजे सरळ, उभं. पेंग्विन ताठ, सरळ उभे राहतात असं तिला म्हणायचं आहे.

**Tom**
And she also describes the waddle as '**ungainly'**.


© British Broadcasting Corporation 2018

**Tejali**
**Ungainly** म्हणजे बेढब, बेडौल. याचे समानार्थी शब्द आहेत **awkward** आणि **clumsy.**

**Tom**
The presenter actually uses a phrase before 'ungainly'. What is it? Listen again after 'the penguin has a **waddle'…**

**Presenter**
With its tiny legs and **stiff, upright posture** a penguin has a **waddle** that's more than a little **ungainly**.

**Tom**
She said '**that's more than a little** ungainly'.

**Tejali**
**More than a little**, म्हणजे quite; म्हणजे थोडं जास्त. त्याचं चालणं दुडूदुडूपेक्षाही, बेडौल जास्त वाटतं. मग Why doesn't she say 'quite **ungainly'?** That's much simpler!

**Tom**
Well, we often say this when we want to suggest something slightly negative in a more positive manner. Plus, the rhythm sounds good. Say it with me to practise!

'a little'
'more than a little'
'more than a little ungainly'!

Can you give us an example now?

**Tejali**
Hmm… Working with you is more than a little difficult, sometimes! अत्याधुनिक ट्रॅकचा वापर करून संशोधक पेंग्विनच्या हालचालींचा अभ्यास करत आहेत; असं टॉमने सांगितलं. यातून मिळालेली माहिती नंतर ते जुन्या माहितीशी पडताळून पाहतील.

**Tom**
We can find stones or rocks with animal remains inside them. What's the name for these? Let's listen again!

**Presenter**
But by installing a high-tech track in London Zoo, scientists will measure every tiny movement the birds make. The researchers will then compare this data with penguin **fossils.**

**Tom**
Aha! She said penguin **fossils!**


© British Broadcasting Corporation 2018

**Tejali**
**A fossil** म्हणजे जीवाश्म. प्राणी पक्षी जेव्हा जमिनीखाली गाडले जातात तेव्हा त्यांच्यावर प्रचंड दाब येतो आणि त्यांच्या अवशेषांचं दगडात रुपांतर होतं किंवा त्यांच्या अवशेषांचे ठसे दगडावर उमटतात. याला जीवाश्म म्हणतात. या जीवाष्मांमुळे प्राचीन काळातील जीवनसृष्टी कशी होती हे समजायला मदत होते. आता जरा थांबू. पेंग्विनचं posture, stiff, upright असतं आणि त्यांचे पाय छोटे असतात असं आपण आत्ता ऐकलं. पण त्यांचे पूर्वजही तसेच होते का?

**Presenter**
The researchers will then compare this data with penguin **fossils.** They think that the ancient birds didn't **waddle** and had a more **horizontal posture** with different leg **anatomy**. The scientists suspect that as modern-day penguins became better **adapted** to swimming, they became more **clumsy** on land.

**Tom**
So, they aren't the same! We've heard how modern penguins have an **upright posture**. Penguins in the past were the opposite! They had a **horizontal posture**.

**Tejali**
**Horizontal**, म्हणजे जमिनीला किंवा क्षितीजाला समांतर, which means they were lying flat!

**Tom**
Right! Their legs have probably **adapted** over time as their **posture** changed.

**Tejali**
To adapt म्हणजे जुळवून घेणे. याचा वाक्यात उपयोग करताना 'adapt to' + [नाम (noun) /क्रियापद] पण क्रियापद वापरताना त्यासोबत –ING वापरायचं. पण पेंग्विन्सनी कशाला जुळवून घेतलं?

**Presenter**
The scientists suspect that as modern-day penguins became better **adapted** to swimming, they became more **clumsy** on land.

**Tom**
So, penguins **adapted to** swimming. This means the **anatomy**, or structure, of their legs changed to become more suitable for water.

**Tejali**
And that's why they're **clumsy**, म्हणजे गोंधळलेला किंवा विस्कटलेला.!

**Tom**
Exactly! So, have you adapted to presenting Listen Here yet?

**Tejali**
I think I've adapted by now! And we hope your ears are adapting to our show! आणखी


© British Broadcasting Corporation 2018

जाणून घेण्यासाठी पुढचा भाग नक्की ऐका. Tom! Say goodbye.

**Tom**
Bye everyone! See you next time!

**Tejali**
Bye.


© British Broadcasting Corporation 2018